**पद्व्यूत्तर विद्यार्थ्यांकरिता लेखनतंत्र व कौशल्ये कार्यशाळा**

दि. २८,२९/१२/२०१९ रोजी पदव्युत्तर विद्यार्थ्यांकरिता लेखनतंत्र व कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. अशोक तेजनकर, प्र. कुलगुरु यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागाचे प्र. संचालक डॉ. संजय मून हे होते. सुरुवातीला डॉ. संजय मून यांनी डॉ. अशोक तेजनकर यांचे स्वागत केले तर डॉ. संजय मून यांचे स्वागत डॉ. आनंद वाघ यांनी केले.



प्रो. तेजनकर उद्घाटपन पर भाषणात म्हणाले की, या कार्यशाळेमुळे आपल्यात निश्चित विधायक कदल होतील. आपल्या मनातील भावना शब्दात व्यक्त करायला आल्या पाहिजेत. आपली मांडणी समोरच्या व्यक्तीच्या ह्दयात पोहोचली पाहिजे. आपले लिखाण दुसऱ्याच्या ह्दयाला भिडले पाहिजे. त्यासाठी आपण लेखन कौशल्य हस्तगत केले पाहिजे. संशोधन करत असताना आपण त्याच्या सर्व बांबीचा सखोल अभ्यास केला पाहिजे. आपल्याला अनेक गोष्टीच्या मर्यादा आहेत परंतु आपण आपले संशोधन दर्जेदार केले पाहिजे. आपल्या संशोधनाचा पाया मजबूत असला पाहिजे. संशोधन करत असताना आपला आपल्यावर विश्वास असला पाहिजे. संशोधनातून आपल्याला नवीन साध्य करता आले पाहिजे. लिखानाला कौशल्य असावे कारण लिखानाचा परिणाम समाजावर होतो व पर्यायाने आपला देश मजबुत होतो. संशोधनामुळे मानवी जीवन सुकर होते. संशोध□ हे मा□वी जीवनाला दिशा देणारे असते. संशोधन हे समाजउपयोगी असले पाहिजे. माझ्या संशोधनाचा फायदा समाजातील सर्व घटकांना झाला पाहिजे. कोणतेही काम मनापासून करा.

**डॉ.दासू वैद्य**

सर्जनशिल लेखनतंत्र या विषवार बोलताना डॉ. वैद्य म्हणाले की, सृजनशिल लेखन म्हणजे काही तरी नविन निर्माण करणे. भावनेच्या नवनिर्मितीला आपण हजारो वर्षापासून जपून ठेवतो. लोककथा आपण पिड्या न पिड्या

जपून ठेवल्या आहेत. सृजनशिल लेखनात तुमचे व्यक्तीत्व उतरत असते म्हणून बालकवीच्या अर्धवट कविता कोणालाच पूर्ण करता आल्या नाहीत परंतु विज्ञानातील संशोधने मात्र पुढील पिढ्यांनी पूर्ण केले. सृजनशिलता ही मौल्यवान असते. सृजनशिलता ही अनेक पातळीवर असते. सृजनशिलता ही मुळात आपल्यात असते परंतु ती वाढवण्याची गरज असते. जीवनाच्या गोगांटात स्वतःचा स्वर आपण जपला पाहिजे. More personal became more universal आपल व्यक्तिमत्व आणि आपला एकोपा झाला पाहिजे.